**विशेष दिवाणी दावा क्र. १६/२०२५**
**बाळु सोमासे**
**विरुध्द रंजना**
**निशाणी क्र. १२**

**<u>आज रोजी पुढील उलटतपास प्रतिवादी तर्फे विद्वीज्ञ श्री वाय.एन.जाधव यांच्या मार्फत शपथेवर सुरु</u>**

**०१.** हे म्हणणे खरे नाही की, उपरोक्त धनादेश केवळ आमच्यातील व्यवहाराला धर म्हणून केवळ सही करुन प्रतिवादी क्र. २ यांनी दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, एकुण तीन धनादेश प्रतिवादी क्र. २ ने मला धर म्हणुन केवळ सही करुन दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यातील एकाचा क्रमांक ०७७४८१ असा होता. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. २ यांचा कुकुटपालनाचा व्यवसाय आहे. हे मला माहित नाही की, आज ही पुर्वीच्याच जागेवर प्रतिवादी क्र. २ चा कुकुटपालनाचा व्यवसाय चालु आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.११.०२. २०२२ रोजी प्रतिवादींना भेटण्याचा मला योग आला नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, त्यादिवशीच ईसारपावती झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. २ व माझ्या व्यवहारात शेवटचे प्रतिवादी क्र. २ ने माझ्याकडुन ५,००,०००/- रुपये घेतले होते. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, ६,००,०००/- रुपये घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, उपरोक्त रक्कम प्रतिवादी क्र. २ ने त्याच्या कुकुटपालनाच्या व्यवसायासाठी वेळो वेळी घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. २ याने मला ऑनलाईन बॅक व्यवहारामार्फत २,५३,०००/- रुपये परतफेड केले होते. साक्षीदार स्वत:हुन सांगतात की, तो व्यवहार वेगळा होता. हे म्हणणे खरे नाही की, सप्टेंबर २०२२ रोजी प्रतिवादी क्र. २ याने ३,२७,०००/- रुपये रोख अतिक कुरेशी याच्या दुकानात पाचशेच्या नोटांच्या स्वरुपात दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, एकंदरीतच प्रतिवादी क्र. २ याने मला एकुण ५,८७,०००/- रुपयांची परतफेड करुन व्यवहार पुर्ण केला होता. हे म्हणणे खरे नाही की, उपरोक्त प्रमाणे पुर्ण रक्कम दिल्यानंतर प्रतिवादी क्र. २ याने माझ्याकडे त्याने धर म्हणुन दिलेल्या धनादेशाची मागणी केली मात्र मी त्यास ते धनादेश दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी बनावट दस्त तयार करुन केवळ जमीन हडप करण्यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे.

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीला आर्थीक अडचण असल्यामुळे त्याने वाद मिळकत विक्री करण्याचे ठरवले व ते मी खरेदी घेण्याची तयारी दर्शवुन आमच्यात

ईसारपावती झाली हे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, १०० रुपयाच्या बॉडपेपरवर नोटरी समक्ष ईसारपावती करण्यात आली व त्यावेळेला मी प्रतिवादी क्र. २ यास ६,००,०००/- रुपये दिले, उर्वरीत दोन लाख खरेदीखताच्या वेळी देण्यात येईल असे आमच्यात ठरले होते हे खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र. १ व २ ला कोणतीही नोटीस पाठवली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यात केलेली मागणी करण्याचा मला अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र. २ ला हात ऊसनवार रक्कम दिली होती त्याची त्याने परतफेड करुनही केवळ प्रतिवादी क्र. २ ने हात ऊसनवार व्यवहाराला धर म्हणुन दिलेले धनादेश याचा गैरफायदा घेऊन खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यात व प्रतिवादीत कोणताही करारनामा वा ईसारपावती झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींची जमीन बळकवण्यासाठी खोटा दावा दाखल केला व खोटी साक्ष दिला आहे.

**उलटतपासपुर्ण**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

Digitally signed by ROHIT NANDKISHOR PATHAK
Date: 2026.01.31 16:23:44 -0100

रोहीत नं. पाठक

दिनांकः- ३०.०१.२०२६

**सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,**
**गंगापूर**

( )

**विशेष दिवाणी दावा क्र. १६/२०२५**
**बाळु**
**विरुध्द रंजना**
**निशाणी क्र. १२**

**<u>उलटतपास प्रतिवादी तर्फे विद्यीज्ञ श्री वाय.एन.जाधव यांच्या मार्फत शपथेवर सुरु</u>**

माझे गाव ते वाद मिळकतीतील अंतर तीन ते चार कि.मी. आहे. अजिनाथ मोरे माझे नातेवाईक आहेत. आमच्यात आर्थीक व्यवहार होत होते. रंजना मोरे यांच्यासोबत माझा कधीही आर्थीक व्यवहार होत नव्हता. मला अजिनाथ मोरे यांच्याकडुन रक्कम रुपये पाच लाखाचा धनादेश मिळाला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर धनादेश याच व्यवहारासंबंधी होता. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, सदर धनादेश आम्ही त्यांना वकीलांकडुन नोटीस दिल्यानंतर दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर धनादेश बॅकेत वटला नाही. हे म्हणणे खरे आहे की, धनादेश न वटल्याने कलम १३८ परक्राम्य संलेख अधिनियम अन्वये न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे.

वकीलांच्या तोंडी विनंती वरुन उलटतपास तहकुब.

**श्रवणोत्तर स्वीकृत**

रोहीत नं. पाठक

दिनांकः- २०.०१.२०२५

**सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,**
**गंगापूर**